श्री संत अच्युत महाराज मंदीर संस्थानला

# नगरपरिषदेने ठोकले टाळे : काही वेळातच टाळे 'ओपन'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – सद्य: वरुड शहरातील श्री संत अच्युत महाराज मंदीर चर्चेचा विषय ठरला आहे, माजी नगराध्यक्ष स्वाती आंडे यांचे पती युवराज आंडे यांनी केलेल्या तक्रारीवरुन वरुड नगरपरिषदेने या मंदीर परिसराला टाळे ठोकले खरे परंतु अधिकारी आणि कर्मचारी यांनी केलेल्या कारवाहीला चुकीचे ठरवित ठोकण्यात आलेले ताळे पुन्हा उघडण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

सविस्तर माहीतीनुसार, शहरातील श्री संत अच्युत महाराज मंदीर परिसर हा ले-आऊट मध्ये असलेल्या बाग अथवा खुल्या जागेच्या म्हणजे परिसरातील नागरिकांच्या हक्काच्या जागेत उभारण्यात आलेले आहे. शासकीय नियमानुसार संबंधित जागा संस्था किंवा इतरांना देत असतांना उपलब्ध असलेल्या खुल्या जागेपैकी तळमजल्यावर केवळ १० टक्के आणि पहिल्या मजल्यावर केवळ ५ टक्के बांधकाम करण्याची परवानगी नगरपरिषदेच्या वतीने दिल्या जाते आणि शासनाच्या निर्देशानुसार नगरपरिषद घालुन देत असलेल्या अटी आणि शर्थीला अधिन राहून या खुल्या जागेचा वापर करावा लागते, एवढेच नव्हे तर उर्वरीत ९० टक्के जागेचे सौंदर्यीकरण करुन परिसरातील रहिवाशांना त्याचा वापर करु देणे बंधनकारक आहे, असे असतांना श्री संत अच्युत महाराज मंदीर संस्थानने शासनाने ठरवुन दिलेल्या सर्व अटी आणि नियमांचा भंग केला असुन युवराज आंडे यांनी मागितलेल्या माहीतीच्या अधिकारामध्ये ही बाब पुढे आली असून या संस्थानला शासनाकडून दोनदा निधी प्राप्त झाला आणि त्यातुन बांधकाम सुध्दा करण्यात आले. शासकीय निधी असतांना सुध्दा या संस्थानचे काही पदाधिकारी स्वत:च्या मालकीचे संस्थानचे असल्यागत वावरत असल्याचे निदर्शनास येत असल्याचे युवराज आंडे यांचे म्हणणे आहे.

या ठिकाणी उभारण्यात आलेला सभामंडप या संस्थानने एका कंत्राटदाराला भाडे तत्वावर देवुन त्यातून मिळकत मिळविली जात आहे मात्र नगरपरिषदेला ठेंगा दाखविल्या जात आहे, त्यामुळे जागा ले-आऊटमधील या ठिकाणी उभारण्यात आलेले बांधकाम शासनाच्या निधीतून मात्र त्यातुन मिळणारी मिळकत मात्र संस्थानचे काही पदाधिकारी स्वत:च्या खिशात घालत असल्याचे दिसुन येत असून संबंधित संस्थानची चौकशी करण्याची मागणी सुध्दा केली आहे.

युवराज आंडेयांनी माहीतीच्या अधिकारात माहीती मागताच नगरपरिषद प्रशासन जागे झाले आणि लगेच त्यांनी संबंधित संस्थान मध्ये जावुन त्या संस्थानला टाळे ठोकले परंतु टाळे ठोकताच त्यामध्ये राजकीय नेत्यांचा प्रवेश झाला आणि मुख्याधिकारी व नगर प्रशासनाच्या आदेशाने लावण्यात आलेले टाळे काढण्याचे निर्देश देण्यात आले. नगरपरिषदेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी केलेली ही कारवाही चुकीची असल्याचा आव आणल्या गेला आणि अवघ्या काही कालावधीतच लावण्यात आलेले कुलूप काढण्यात आले त्यामुळे करण्यात आलेली ही कारवाही चुकीची होती की बरोबर? हा प्रश्न सुध्दा या निमित्ताने उभा ठाकला आहे.

करण्यात आलेली कारवाही ही बरोबर असेल तर ते टाळे कायम करण्यात यावे अन्यथा ज्या कर्मचाऱ्यांनी हे टाळे ठोकले त्यांचेवर नियमानुसार कारवाही करण्यात यावी, अशी मागणी आता जनतेतून केली जात आहे.



"समाजमंदीर हे नगरपरिषदेच्या निधीतून बांधण्यात आले आहे, केवळ १० टक्के जागा ही बांधकाम करता येते परंतु उत्पन्नाचा खोटा आव आणणाऱ्या नगरपरिषदेकडून तिलांजली देण्यात येत आहे. २३ मार्च २०२३ ला शासनाची दिशाभुल करुन २१ लाख ०५ हजार ९४३ रुपयांचा निधी मिळवुन जास्तीचे अतिक्रमण करुन बांधकाम करण्यात आले आहे, ही बाब नियमबाहय आहे. गरीब विद्यार्थ्यांची असलेल्या अभ्यासिकेची फी १०० रुपयांवरुन ३०० रुपये केली आणि स्वत:चे हितसंबंध जोपासणाऱ्या काही ठराविक लोक नगरपरिषदेच्या जागेचे उत्पन्न घेत आहे, माझा कोणत्याही एका व्यक्तीला व्यक्तीश: विरोध नाही, जे जे सभागृह नगरपरिषदेच्या निधीतून बांधण्यात आले त्यावर नगरपरिषदेची मालकी असावी आणि त्यातून मिळणारे उत्पन्न नगरपरिषदेला मिळावे, अशी प्रतिक्रिया युवराज आंडे यांनी व्यक्त केली.



"युवराज आंडे यांनी माहीतीच्या अधिकाराचे पत्र दिले, त्यांना माहीती पुरवायला पाहीजे होती, त्यासंदर्भात पहिले आम्हाला माहीती मागायला पाहीजे होती आणि कोणतीही पुर्वसूचना न देता अशा प्रकारची कारवाही करणे चुकीची आहे, अशा प्रकारे संस्थानला अपमानित करुन कारवाही करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना नगरपरिषदेने ताकीद द्यावी, जेणेकरुन असा प्रकारच पुन्हा घडणार नाही, अशी मागणी श्री संत अच्युत महाराज मंदीर संस्थानचे सहसचिव धनराज मानकर यांनी केली आहे.

दारुच्या नशेत पती पत्नीस मारहाण करुन

# घराला आग लावल्या प्रकरणी पतीविरुध्द गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – दारुच्या नशेत पती पत्नीस मारहाण करुन घराला आग लावल्याप्रकरणी पत्नीच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी सुरळी येथील मद्यपी पतीविरुध्द विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

तालुक्यातील सुरळी येथील फिर्यादी माया गोमकाळे व आरापी भुषण गोमकाळे हे पत्नी, पती असुन आरोपी भुषण हा दारु पिवुन आला फिर्यादीही वरुड येथे दवाखान्यात आल्या असता फिर्यादी माया हिचे मुलीने मायाला फोन करून माहीती दिली असता 'बाबा हे दारू पिवुन घरी आले व शिवीगाळ करून मारहाण करीत आहे आणि घरातील सामान फेकफाक करीत आहे' वरुन फिर्यादी माया ही घरी पोहचली असता घरातील सामान फेकफाक केल्याने त्या सामानावर पडुन माया जखमी झाली होती 'तु या घरात राहु नको' अशी धमकी देत होता नंतर फिर्यादी माया हिने आरोपी भुषण विरुध्द पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती.

१६ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास आरोपी भुषण याने फिर्यादी माया सोबत पुन्हा भांडण करुन थापडांनी मारुन घर नष्ट करण्याचे उददेशाने घराला आग लावुन फ्रिज, सोपा, दिवाण, टिव्ही, इतर घरगुती सामान जळाल्याने फिर्यादीचे १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले.

फिर्यादी माया गोमकाळे हिचे तक्रारीवरुनआरोपी भुषण विष्णुपंत गोमकाळे (४०) याचे विरुध्द कलम ३०३ (२), ४९ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ९, १५ तसेच महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ चे कलम ४८(७), ४८(८) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# नाशकात पीजीमध्ये राहणाऱ्या तरुणीला भररस्त्यात संपवलं : कायद्याच्या बालेकिल्ल्यात धक्कादायक घटना!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नाशिक** – शहरात दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशातच आता नाशिकच्या इंदिरानगर परिसरामध्ये एका तरुण मुलीची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या थरारक घटनेमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. रात्री १०:३० वाजता घडला थरार याबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, नाशिकच्या इंदिरानगर येथील वनसंपदा सोसायटीतील गार्डनजवळ रात्री १०:३० वाजेच्या सुमारास ही घटना घडली. वैष्णवी अनिल आवारे असे मृत तरुणीचे नाव आहे. वैष्णवी ही मूळची जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथील रहिवासी असून ती नाशिकमध्ये वनसंपदा सोसायटीत पेईंग गेस्ट म्हणून राहत होती. प्रेमप्रकरणातून हत्या झाल्याचा संशय रात्रीच्या वेळी वैष्णवी सोसायटीजवळून जात असताना, एका माथेफिरू तरुणाने तिच्यावर अचानक हल्ला केला. त्याने धारदार चाकूने वैष्णवीवर सपासप वार केले. हा हल्ला इतका भीषण होता की, वैष्णवी रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळली. ती निपचित पडल्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून फरार झाला. वैष्णवी रस्त्याच्या कडेला रक्ताच्या थारोळ्यात पडलेली पाहून स्थानिक नागरिकांनी तातडीने याची माहिति पोलिसांना दिली. माहिति मिळताच इंदिरानगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.










